# पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर

## विशेष प्रेसनोट

दिनांक ११/०४/२०१८

पो.स्टे. सायबर, अमरावती शहर येथे दिनांक १०/०४/२०१८ रोजी फिर्यादी मनिष गुणवंतराव शेळके, वय- ४० वर्ष, रा. चौबळ प्लॉट, राजापेठ, अमरावती यांनी तक्रार दिली कि, दिनांक ०९/०४/२०१८ रोजी फिर्यादी कामानिमीत्त बाहेरगावी असताना त्यांना सकाळी ११ वा. दरम्यान ०७५४७८८६१८९ या क्रमांकावरुन फोन आला व फोन करणा —याने बजाज फायनांस मधुन बोलत असल्याचे सांगितले व फिर्यादीचे नाव, पत्ता व जन्म तारिख अशी वैयक्तीक माहिती सांगुन तुम्हाला खाते पुन्हा सुरु करायचे आहे का याबाबत विचारपुस केली असता फिर्यादी यांनी दुसऱ्या दिवशी बजाज फायनांस च्या अमरावती येथील स्थानिक कार्यालयात जावून खाते सुरु करुन घेतो असे कळविले असता त्या व्यक्तीने आज शेवटचा दिवस असुन उद्या गेल्यास खाते पुन्हा सुरु करता येणार नाही असे सांगितले. यासाठी फिर्यादीच्या मोबाईलवर येणारा OTP सांगितल्यास खाते पुर्ववत सुरु होईल असे सांगितल्याने फिर्यादीने त्यांना आलेला OTP फोन करणा —या व्यक्तीला दिल्यावर थोड्याच वेळात फिर्यादीच्या मोबाईलवर त्यांच्या बजाज फायनांस खात्यामधुन ५७४८० रु. ची फ्लीपकार्ट मधुन खरेदी केली असल्याचा मेसेज आला. यावरुन फिर्यादीला आपली फसवणूक झाल्याची खात्री झाल्याने फिर्यादी यांनी तक्रार दिली. फिर्यादीच्या अशा तक्रारीवरुन पो.स्टे. सायबर अप.क्र. ०३/१८ कलम ४१९, ४२० भादवि सहकलम ६६(ड) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये दाखल करुन तपासात घेतला.

सदर गुन्ह्याचे तपासात पो.स्टे. सायबरचे अधिकारी व कर्मचारी यांनी तत्परता दाखवत तात्काळ आपली तपासाची सुत्रे हलवत फ्लीपकार्ट शी संपर्क साधुन खरेदी करण्यात आलेल्या सामानाची डिलीव्हरी थांबवून ठेवण्याबाबत कळविले व बजाज फायनांस यांचेशी संपर्क साधुन फिर्यादी यांच्या खात्यावरुन घेतलेले कर्ज रद्द करण्याविषयी कळविले. सदर चे ट्रानजेक्शन रद्द करणेबाबत कळविले व त्याचा पाठपुरावा करत सदरचा व्यवहार रद्द करुन फसवणूक करणाऱ्या अज्ञात व्यक्तीने फिर्यादीच्या नावे घेतलेले कर्ज रद्द करवून घेतले व याबाबत फिर्यादीला माहिती देवून दिलासा दिला.

सदर कार्यवाही सायबर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिगांबर नागे यांचे मार्गदर्शनात सपोनि कांचन पांडे, पोउपनि ईश्वर वर्गे, पोहवा जगदीश पाली, नापोशि दिपक बदरके, पोशि संग्राम भोजने, पोशि गोपाल सोळंके यांनी केली.

पोलीस आयुक्त अमरावती शहर
यांचे करिता